## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२९२/२०२३

**अपिलार्थी, श्री.केरु गंगाराम पाळेकर,**
**९०१, डी विंग, राय हेरिटेज, कमलादेवी कॉलेजच्या**
**जवळ, पो.काटेमानिवली, विठ्ठलवाडी पूर्व,**
**ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०६.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय नाणार, ता.राजापूर,
जि.रत्नागिरी ४१६ ७०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय राजापूर, ता.राजापूर,
जि.रत्नागिरी ४१६ ७०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.८.२०२२ | ---- | २७.१०.२०२२ | --- |

अपिलार्थी यांनी दि.२३.१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थींचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. परशुराम कि. डिगुळे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नाणार, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. नंदलाल म. सुर्यवंशी, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय राजापूर हे ऑनलाईन उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मौजे पाळेकरवाडी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी जागेचे नाव तागवळ, येथील घर क्रमांग ४४ च्या मागील बाजूस दाजी पाळेकर, मोहन पाळेकर, मोहन पाळेकर, केशव पाळेकर प्रेमा पाळेकर आणि विष्णू पाळेकर यांनी प्रत्येकी एक असे एकूण पाच अनधिकृत शौचालयाचे बांधकाम माझ्या वहिवाटीच्या जमिनीत केले आहे त्यासंबंधी माहिती हवी आहे.)"*

*"(अ. सदर अनुदान घेण्यासाठी दाजी पाळेकर, मोहन पाळेकर, केशव पाळेकर, प्रेमा पाळेकर आणि विष्णू पाळेकर यांनी केलेल्या अर्जाची प्रमाणित प्रत. आ. सदर अर्जासोबत जोडलेला दाजी पाळेकर, मोहन पाळेकर, केशव पाळेकर, प्रेमा पाळेकर आणि विष्णू पाळेकर हे दारिद्रय रेषेखाली असल्याच्या दाखल्याची प्रमाणित प्रत. इ. सदर अर्जासोबत त्यांनी जोडलेली कागदपत्रे म्हणजेच त्यांनी दिलेले प्रतिज्ञापत्राची प्रमाणित प्रत. ई. सदर अर्जासोबत कागदपत्रांमध्ये जोडलेला सातबाराचा उताराची प्रमाणित प्रत. उ. सदर अर्जासोबत भोगवटा दाराचे जोडलेले संमती पत्राची प्रमाणित प्रत. ऊ. सदर अर्ज मंजूर केल्याची ग्रामपंचायत ठरावाची प्रमाणित प्रत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "विहित मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही त्यामुळे त्यांनी प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलामध्ये तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नाणार (सध्या कार्यरत-लोणार पंचायत समिती, जि. बुलढाणा) यांनी असे निवेदन केले की, त्यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना पुरविलेल्या माहितीबाबतचे पत्र व माहिती प्राप्त झाल्याची पोहोच या संदर्भात विचारणा केली असता सदरचा अभिलेख उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून अपिलार्थी यांना माहिती दिल्याबाबतचा पुरावा विद्यमान जन माहिती अधिकारी सादर करू शकत नसल्याने अपिलार्थी यांना माहिती देण्यात आली नाही असे समजण्यात येत आहे. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नाणार (सध्या कार्यरत-लोणार पंचायत समिती, जि. बुलढाणा) यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नाणार यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नाणार (सध्या कार्यरत-लोणार पंचायत समिती, जि. बुलढाणा) यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७.८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२८.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२८.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमोल बबन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय नाणार, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ४१६ ७०२
(सध्या कार्यरत-लोणार पंचायत समिती, जि. बुलढाणा)

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. परशुराम कि. डिगुळे, ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय नाणार, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ४१६ ७०२ **यांचेमार्फत रवाना.**
**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सदरची नोटीस न बजाविल्यास त्यांना जबाबदार धरण्यात येईल).**